# मंगेश सावंत

## संस्थापक, सायली डेव्हलपर्स

## बोरिवली गौरव २००९

या पुरस्काराने प्रथमवर्षी आपल्याला सन्मानित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

एखादी इमारत बांधताना तिचा पाया भक्कम असेल तरच ती मजबूत बनते. आपणही बांधकाम क्षेत्रातल्या आपल्या भक्कम शिक्षणाच्या पायावर आपल्या कारकीर्दीचं शिखर उभं केलं आहे. 'सायली डेव्हलपर्स' या आपल्या कंपनीनं आतापर्यंत पश्चिम उपनगरात अनेक निवासी इमारती, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातल्या इमारती, खाजगी भूखंडावरच्या इमारती तसंच म्हाडाच्या घरांच्या बांधकामाची यशस्वी कामं केली आहेत. केवळ बोरिवलीतच नव्हे तर दादर, अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, कांदिवली इथंही बांधकाम व्यावसायिक म्हणून एक वेगळं अस्तित्व आपण निर्माण केलंय. शहरात येऊ घातलेले आपले प्रकल्प सतत याची साक्ष देत राहतील.

आपलं हे कार्य केवळ उल्लेखनीयच नाही तर अतुलनीय आहे. आपली कार्यसीमा आपण केवळ बोरिवली पुरतीच मर्यादित ठेवली नाही तर त्याची व्याप्ती वाढवून आपण समाजात एक वेगळा ठसा उमटवला आहे. आपल्या बौध्दीक, मानसिक, वैचारिक शक्तीमुळेच आपलं हे कार्य अद्वितीय ठरलं आहे. आपल्या या कार्याने आम्हा बोरिवलीकरांची मान आपण अभिमानाने ताठ केलेली आहे. आपल्या या कार्यासाठी समाज आपला अत्यंत ऋणी आहे. हा पुरस्कार देवून हे ऋण फेडण्याची सुवर्णसंधी आम्हाला लाभली आहे.

मा.ना. नारायण राणे, कोकणचे सुपुत्र, माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान महसुल मंत्री यांच्या हस्ते आपण या पुरस्काराचा स्विकार करत आहात, हा अतिशय आनंदाचा सोहळा आहे. आपल हे कार्य उत्तरोत्तर बहरत जावो आणि वटवृक्षरुपी या आपल्या कार्याचा कल्पवृक्ष होवो हिच मन:पुर्वक शुभेच्छा !

धन्यवाद !

आपले

**मा.ना.नारायण राणे**
महसुल मंत्री-महाराष्ट्र राज्य

**मा.डॉ.निलेश राणे**
खासदार - रत्नागिरी, सिंधुदुर्ग

**उत्तर मुंबई जिल्हा कॉंग्रेस कमिटी (आय) ब्लॉक क्र. ६४**

१४ फेब्रुवारी २०१०, मुंबई, ४०० ०९२

[redacted]